N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** चाळीसगांव **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0473 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/12/2021 06:12 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 27/12/2021

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/12/2021

**Time From (वेळेपासून):** 18:19 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:19 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/12/2021 **Time (वेळ):** 04:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/12/2021 04:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** चाळीसगाव शहरातील घाट रोड, वरील आरोपीचे सैय्यद क्लिनीकमध्ये,चाळीसगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** चाळीसगांव

**District(State) (जिल्हा(राज्य)):** जळगाव(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** धिरज अशोक कासोदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | प्लॉट नं22 वंदावन नगर जुना,नाका,मालेगाव रोड,चाळीसगाव ता चाळीसगाव ,चाळीसगांव , जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | प्लॉट नं22 वंदावन नगर जुना,नाका,मालेगाव रोड,चाळीसगाव ता चाळीसगाव ,चाळीसगांव , जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | -मुस्ताक मोतेबार सैय्यद | | | 1. घाट रोड चौधरीवाडा,चाळीसगाव ताचाळीसगाव ,चाळीसगांव ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 60,000/रुपये त्यात दोन हजार रुपये दराच्या 25 नकली नोटा व 500 रुपये दराच्या 20चलनी नोटा | 60,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 60,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खुलासा:- यातील फिर्यादी यांचे दोन अँम्बुलन्स वाहने असुन सन 2020 मध्ये कोरोना आजाराच्या काळात नमुद दोन्ही अँम्बुलन्स वाहने हे ग्रामीण रुग्णालय चाळीसगाव येथे भाडे तत्वावर लावण्यात आलेले होते.सदर एक अँम्बुलन्स वाहनाचे 1,55,440/- रुपये व दुस-या अँम्बुलन्स वाहनाचे 2,66,500/- रु.असे दोन बिले फिर्यादी यांनी मंजुरीसाठी टाकले होते सदर बिलाची पडताळणी होवुन सदर बिलामध्ये त्रुटी असल्याने सदरचे बिल मा.वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय चाळीसगाव यांचेकडे परत आले होते व त्यांच्या कार्यालयात प्रलंबित होते.सदर बिलंबा बाबत फिर्यादी हे दि.22/12/2021 रोजी ग्रामीण रुग्णालय चाळीसगाव येथे विचारपुस करण्यासाठी गेले असता सदर ठिकाणी आरोपी हे फिर्यादीस भेटले व तुमचे दोन अँम्बुलन्सच्या बिलांच्या मंजुरीसाठी लागणारे पत्र मा.वैद्यकीय अधिक्षक डॉ.मंदार कळंबकर,ग्रामीण रुग्णालय चाळीसगाव यांच्याशी बोलणी करुन त्यांचेकडुन बिल मंजुरीसाठी लागणारे पत्र तयार करुन आणुन देतो असे सांगुन त्या मोबदल्यात डॉ.सैय्यद यांनी फिर्यादी यांचकडे 60,000/-रु.लाचेची मागणी केली बाबत फिर्यादी यांनी दि.25/12/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो,जळगाव यांचे कार्यलयाकडे तक्रार दिली होती.सदर तक्रारीची दि.27/12/2021 रोजी सापळा अधिकारी यांनी पंच साक्षीदारा समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी यांनी फिर्यादी यांचेकडेस त्यांचे दोन्ही अँम्बुलन्स वाहनाचे बिले मंजुरीसाठी लागणारे पत्र वैद्यकीय अधिकारी डॉ. मंदार कळंबकर याचेकडुन तयार करुन आणुन देण्याच्या मोबल्यात डॉ.सैय्यद यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन आपल्या वैयक्तिक प्रभावाचा वापर करुन डॉ मंदार कळंबकर यांच्यासाठी फिर्यादी यांचेकडेस 60,000/- रुपयांची लाचेची मागणी केली त्यानंतर सदर लाच रक्कम वरील नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी यांनी स्वत स्विकारली म्हणुन गुन्हा.सोबत फिर्यादची प्रतजोडलेली आहे.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**13.Action** Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** kantilal kashinath patil(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणांमुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)** Dhiraj

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पो. ठा. अंमलदार

चाळीसगांव शहर पो.स्टे.

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** kantilal kashinath patil

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

फिर्याद

चाळीसगांव शहर पोलीस स्टेशन, जि.जळगाव
दिनांक २८/१२/२०२१

मी धिरज अशोक कासोदे, वय २९, व्यवसाय ॲम्ब्युलन्स चालक मालक,रा. प्लॉट नं. २२, वृंदावन नगर, जुना मालेगांव नाका, मालेगांव रोड, चाळीसगांव जि. जळगांव समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझी माझे आई वडीलांसह राहतो. मी ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयाचे पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील यांचेकडेस दुरध्वनीव्दारे लाचे संबधी तक्रार केली होती व त्यावेळी मी त्यांना दि. २५.१२.२०२१ रोजी चाळीसगांव शहरातील धुळे रोडवरील अग्रवाल ले आउटच्या मोकळया मैदानात भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे मी दि.२५.१२.२०२१ रोजी सकाळी १०.४५ वा. चाळीसगांव शहरातील धुळे रोडवरील अग्रवाल ले आउटच्या मोकळया मैदानात उपस्थित होतो. त्यानंतर काही वेळाने पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील,पोनि.बच्छाव साहेब,दोन शासकीय पंच व सापळा पथक असे खाजगी तवेरा वाहनाने चाळीसगांव शहरातील धुळे रोडवरील अग्रवाल ले आउटच्या मोकळया मैदानात मी थांबुन असलेल्या ठिकाणी आले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांनी पोनि.बच्छाव साहेब यांची सापळा अधिकारी म्हणुन ओळख करुन दिली. त्यानंतर मला त्यांचे खाजगी वाहनात बसवुन घेतले. तसेच सोबत असलेल्या दोन शासकिय पंचाची,सापळा पथकाची व माझी आपआपसात ओळख करून दिली.

त्यानंतर माझी लाचे संबंधीची तक्रार पोनि.बच्छाव साहेब यांनी खाजगी वाहनात सोबत आणलेल्या लॅपटॉप संगणकावर टंकलिखीत करुन घेतली ती पुढील प्रमाणे. माझी आई नामे सौ.मंगल अशोक कासोदे हिचे नावे एक ॲम्ब्युलन्स वाहन क्र.एम.एच.२० डि.डि.०४४१ मारुती ओमीनी आहे. माझी आई अध्यक्ष असलेले श्री.काळुबाई माता ट्रस्ट चाळीसगांव या नावाने एक ॲम्ब्युलन्स वाहन क्र.एम.एच.१९ सी.वाय.२१११३ टेम्पो ट्रॅव्हल्स हे आहे. सदर दोन्ही ॲम्ब्युलन्स वाहने व्यवसायासाठी घेण्यात आलेले आहेत. सदर ॲम्ब्युलन्स वाहने आम्ही चाळीसगांव शहरात रुग्ण सेवेसाठी भाडे तत्वावर चालवित असतो. सदर वाहनापैकी टेम्पो ट्रॅव्हल्स वाहन मी स्वत: चालवितो. तसेच दुस–या मारुती ओमनी वाहनावर इतर चालक खाजगी नोकरीस लावला आहे.

सन २०२० मध्ये सुरु झालेल्या कोरोना महामारी काळात ग्रामीण रुग्णालय,चाळीगांव यांनी ट्रामा सेंन्टर चाळीसगांव येथे माझ्या वरील नमुद दोन्ही ॲम्ब्युलन्स वाहने हे कोरोना आजारचे रुग्ण चाळीसगांव तालुक्यातील गावांमधुन तसेच चाळीसगांव येथुन जळगांव येथे दवाखान्यात ने आण करण्यासाठी भाडे तत्वावर लावण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे मी व माझे चालक अशांनी आमच्या दोन्ही ॲम्ब्युलन्स मा.जिल्हाधिकारी सो,यांच्या आदेशाने ग्रामीण रुग्णालय चाळीसगांव येथे कोरोना रुग्णांसाठी चालविले आहेत. त्यापोटी होणारी यापुर्वीचे बिले आम्हाला वेळोवेळी मिळाली आहेत.

आम्ही आमच्या वाहनांचे बिलाचे देयक हे विहीत नमुन्यात बनवुन ते अंतिम मंजुरीसाठी वैद्यकिय अधिक्षक सो, ग्रामीण रुग्णालय चाळीसगांव यांच्याकडुन पडताळणी करुन ते बरोबर असल्याचे त्यांचे पत्र घेवुन सर्व सामान्य रुग्णालय,जळगांव येथे पाठविण्यात येते. त्यानंतर सदर ठिकाणी बिलाची पडताळणी करण्यात येते.बिले योग्य असल्यास मंजुरीसाठी मा.जिल्हाधिकारी सो, जळगांव यांच्याकडेस पाठविण्यात येतात.त्यानंतर सदर बिलाची रक्कम मंजुर होवुन माझे व माझे आईच्या बॅंकेच्या खात्यात जमा होत असते.

माझे ॲम्ब्युलन्स वाहन क्र.एम.एच.२० डि.डि.०४४१ मारुती ओमीनीचे बिल १,५५,४४०/–रु. व ॲम्ब्युलन्स वाहन क्र.एम. एच.१९ सी.वाय.२१११३ टेम्पो ट्रॅव्हल्सचे बिल २,६६,५००/–रु. असे दोन बिले मी मंजुरीसाठी सामान्य रुग्णालय, जळगांव येथे टाकले होते. सदर कार्यालयाने बिलांची पडताळणी करुन त्यात त्रुटया काढुन सदरचे बिले मा.वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय,चाळीसगांव यांचेकडे परत पाठविले आहेत. त्यानुसार माझे वरील नमुद दोन्ही ॲम्ब्युलन्स वाहनांचे बिले मा.वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय,चाळीसगांव यांच्याकडेस प्रलंबित आहेत.

दि.२२.१२.२०२१ रोजी मी सदर बिलांबाबत विचारपुस करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय,चाळीसगांव येथे गेलो असता सदर ठिकाणी यापुर्वी चाळीसगांव ग्रामीण रुग्णालयांचे १०८ क्रमांकाचे ॲम्ब्युलन्स वरील वैद्यकिय अधिकारी डॉ. सैयद हे भेटले व त्यांनी मला सांगितले की, तुझे दोन ॲम्ब्युलन्सचे बिलाच्या मंजुरीसाठी लागणारे पत्र हे वैद्यकिय अधिक्षक, डॉ.मंदार करंबळकर यांचेकडुन मिळेल, तुला जर तुझे दोन्ही ॲम्ब्युलन्सचे बिले मंजुरीसाठी लागणारे पत्र लागलीच पाहिजे असेल तर, तु मला ६०,०००/–रु. आणुन दे, पैशांशिवाय असे काम होत नाही, माझी ग्रामीण रुग्णालय, चाळीसगांव येथील डॉ.मंदार करंबळकर यांच्याशी चांगली ओळख आहे. मी त्यांच्याशी बोलनी करुन त्यांचेकडुन तुझे दोन्ही ॲम्ब्युलन्सचे बिले मंजुरीसाठी लागणारे पत्र तयार करुन आणुन देतो. तु जर मला ६०,०००/–रु. आणुन दिले नाही, तर तुला तुझे दोन्ही ॲम्ब्युलन्सचे बिले मंजुरीसाठी लागणारे पत्र लवकर मिळणार नाही.तु वेळेवर सदर पत्र सादर केले नाही तर, तुझे बिले सरकार जमा होवुन जाईल असे सांगितले. तेव्हा मी डॉ.सैयद यांना माझी डॉ.मंदार करंबळकर यांच्याशी भेट घालुन द्या असे सांगितले असता डॉ.सैयद यांनी सांगितले की, डॉ.मंदार करंबळकर हे असे कोणालाही भेटत नाही, तुम्ही माझे जवळ ६०,०००/–रु.घेवुन या, तुमचे काम मी लागलीच त्यांच्याकडुन करुन देतो, तुम्हाला कामाशी मतलब आहे, तुम्ही जरी परस्पर डॉ.मंदार करंबळकर यांना भेटले तरी त्याचा काही उपयोग होणार नाही असे सांगितले,

त्यावरुन माझी खात्री झाली की डॉ.सैयद हे माझे दोन्ही ॲम्ब्युलन्सचे बिले मंजुरीसाठी लागणारे पत्र संबंधीत डॉक्टरांकडून तयार करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात माझे कडेस ६०,०००/–रु. लाचेची मागणी करीत आहे. त्यावेळी मी डॉ.सैयद यांना आता माझे जवळ ऐवढे पैसे नाहीत मी तुम्हाला ६०,०००/–रु. देण्यास तयार आहे.परंतु मला थोडा वेळ द्या असे सांगितले असता डॉ.सैयद यांनी तुम्ही दि.२५.१२.२०२१ रोजी सकाळी ग्रामीण रुग्णालय, चाळीसगांव येवुन मला भेटा असे सांगितले. तेव्हा मी त्यांना होकार देवुन निघुन आलो आहे.

माझे दोन्ही ॲम्ब्युलन्स वाहनांचे बिले मंजुरीसाठी लागणारे पत्र तयार करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात माझेकडेस डॉ.सैयद यांनी डॉ.मंदार करंबळकर यांच्यासाठी मागणी केल्याप्रमाणे ६०,०००/–रु.लाचेची रक्कम देण्याची मनापासुन इच्छा नाही, परंतु मी जर

चाळीसगांव शहर पोस्टे गुरन 843/2021 भ्र.प्र.अधि.सन 1988 चे कलम 7-अ प्रमाणे नोंद क्र. 6 वर 08/93 वा दाखल आहे
PSO चाळीसगांव शहर पोस्टे
पो. ठा. अंमलदार
चाळीसगांव शहर पो.स्टे.
जि. जळगांव

Dhiraj

डॉ.सैयद यांना लाचेची रक्कम दिली नाही तर, डॉ.सैयद हे डॉ.मंदार करंबळकर यांच्याकडुन माझे दोन्ही अॅम्ब्युलन्स वाहनांचे बिले मंजुरीसाठी लागणारे पत्र तयार करुन आणुन देणार नाहीत अथवा त्यामध्ये विनाकारण त्रुटया काढुन विलंब करतील, परीणामी माझे बिले सरकार जमा होवुन जाईल म्हणुन मी नाईलाजाने डॉ.सैयद यांनी डॉ.मंदार करंबळकर यांच्यासाठी मागणी केलेली ६०,०००/-रु. लाचेची रक्कम देण्यास तयार झालो आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी..बाबत नमुद आहे.

त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं. १ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डमधील मेमरीकार्ड मध्ये माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य घेतले. त्यानंतर सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, पंच क्रं.१ यांचेसह डॉ.सैयद व डॉ.मंदार करंबळकर यांची भेट घेण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, चाळीसगांव येथे माझे मोटार सायकलने पाठविले होते.

तेव्हा मी व पंच क्र.०१ असे सदर ठिकाणाहुन माझे मोटार सायकलने निघुन ग्रामीण रुग्णालय, चाळीसगांव येथे गेलो. सदर ठिकाणी डॉ.सैयद व डॉ.मंदार करंबळकर हे सदर रुग्णालयात दिसुन आले नाही. त्यामुळे मी सदर ठिकाणाहुन माझे मोबाईल फोनवरुन डॉ.मंदार करंबळकर यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा डॉ.मंदार करंबळकर यांनी मी घरीच आहे, तुम्ही घरीच या असे सांगितले.सदरचे संभाषण ध्वनीमुद्रीत झाले आहे. त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे ग्रामीण रुग्णालय चाळीसगांव येथुन निघुन चाळीसगांव शहरातील लक्ष्मी नगर येथील डॉ.मंदार करंबळकर यांचे शल्य शोभा हॉस्पिटल वजा राहते घर येथे गेलो. सदर ठिकाणी मोटार सायकल उभी करुन मी व पंच क्रं.१ असे डॉ.मंदार करंबळकर यांचे हॉस्पिटलमधील त्यांचे कॅबिनमध्ये गेलो. तेव्हा मी हाताच्या इशा—याने पंच क्रं.१ यांना हे डॉ.मंदार करंबळकर असल्याचे कळविले. त्यानंतर माझी डॉ.मंदार करंबळकर यांच्याशी भेट झाली. त्यानंतर त्यांचेत व माझेत माझे अॅम्ब्युलन्सचे प्रलंबित बिलासंदर्भात चर्चा झाली. तेव्हा त्यांनी मला आपण समक्ष बसुन नियमानुसार बनवुन घेवु, आपण त्याच्यात फसायचे नाही, आपले डाक्युमेन्ट क्लिअर ठेवावे लागतील, जे काय जमेल तेवढी सगळी अॅडजेक्टमेन्ट करुन घेवु आपण, तसे सैयद सर बोलले तसं बघु ना, काही करु, सोमवारी कागदपत्रे घेवुन या आपण बसुन क्लिअर करुन घेवु, आपण पुर्तता केली नाही तर, काम अडकवुन जाईल, सोमवारी डॉक्युमेन्ट सोमवार पासुन आपण कामाला बसु, तुमचे बिल मी पास नाही करणार, सिव्हील सर्जन पास करणार आहेत, सोमवारी आम्ही तुमची केस काय ते बघतो आणि करुन देतो. असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर माझे डॉ.मंदार करंबळकर यांचे सोबत झालेले संभाषण दोन्ही पंचानी व बच्छाव साहेब यांनी ऐकले. त्यांनी मला सोमवार रोजी बोलाविले असल्याची खात्री झाली. त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही सोमवार दि.२७.१२.२०२१ रोजी करण्याचा निर्णय घेतला व मला दि.२७.१२.२०२१ रोजी ०९.४५ वा. चाळीसगांव शहरातील धुळे रोडवरील अग्रवाल ले आउटच्या मोकळया मैदानात हजर राहण्याबाबत सुचना देवुन घरी जाण्यास सांगितले.तसा सविस्तर पंचनामा केला आहे.

त्याप्रमाणे मी दि.२७.१२.२०२१ रोजी सकाळी ०९.४५ वा. चाळीसगांव शहरातील धुळे रोडवरील अग्रवाल ले आउटच्या मोकळया मैदानात उपस्थित होतो. त्यानंतर काही वेळाने पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील,पोनि.बच्छाव साहेब,दोन शासकीय पंच व सापळा पथक असे खाजगी तवेरा वाहनाने सदर ठिकाणी आले. त्यानंतर मला त्यांचे खाजगी वाहनात बसवुन घेतले.

त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं. १ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, पंच क्रं.१ यांचेसह डॉ.सैयद व डॉ.मंदार करंबळकर यांची भेट घेण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, चाळीसगांव येथे माझे मोटार सायकलने पाठविले होते. परंतु सदर रुग्णालयात डॉ.सैयद व डॉ. मंदार करंबळकर हे उपस्थित नव्हते. म्हणुन मी माझे मोबाईल फोनवरुन डॉ.सैयद यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा मी डॉ. सैयद यांना मी ग्रामीण रुग्णालय येथे आलो आहे असे सांगितले असता त्यांनी मला अर्धा एक तासात येतो. तु ६०,०००/-रु.घेवुन ये असे सांगितले असता मी त्यांना पैसे तयार आहेत, काही कमी जास्त होणार नाही का? असे विचारले असता त्यांनी मला नाही सांगितले.तेव्हा मी त्यांना मला फोन करा असे सांगुन फोन बंद केला. सदरचे संभाषण ध्वनीमुद्रीत झाले आहे. त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे सापळा पथकाजवळ परत आलो होतो.

त्यानंतर बराच वेळ होवुन देखील डॉ.सैयद यांचा मला फोन न आल्याने पोनि.बच्छाव साहेब यांनी मला पुन्हा डॉ.सैयद यांचे मोबाईलवर फोन लावण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझे मोबाईल फोनवरुन पुन्हा डॉ.सैयद यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा डॉ.सैयद यांनी मी सरांच्या सोबत असुन त्यांच्या घरी आहे, तु इकडे येत असेल तर येवुन जा असे सांगितले. तेव्हा मी त्यांना येतो असे सांगितले. सदरचे संभाषण ध्वनीमुद्रीत झाले आहे.

त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी पुन्हा मला व पंच क्रं.१ अशांना सुचना दिल्या. त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन फाईल तयार करुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, पंच क्रं.१ यांचेसह डॉ.सैयद व डॉ.मंदार करंबळकर यांची भेट घेण्यासाठी चाळीसगांव शहरातील लक्ष्मी नगर येथील डॉ. मंदार करंबळकर यांच्या हॉस्पिटल येथे माझे मोटार सायकलने पाठविले होते.

त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे माझे मोटार सायकलने निघुन चाळीसगांव शहरातील लक्ष्मी नगर येथील डॉ.मंदार करंबळकर यांच्या हॉस्पिटल जवळ गेलो. तेव्हा मी हॉस्पिटलच्या बाहेरुन पुन्हा माझे मोबाईल फोनवरुन डॉ.सैयद यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा मी डॉ.सैयद यांना मी आलो आहे, बाहेर थांबु का? असे सांगितले असता डॉ.सैयद यांनी होकार दिला. त्यानंतर लागलीच डॉ.सैयद हे सदर हॉस्पिटलच्या बाहेर येत असतांना दिसले. तेव्हा पंच क्रं.१ यांना हाताच्या इशा—याने हे डॉ.सैयद असल्याचे कळविले. त्यानंतर डॉ.सैयद हे मी व पंच क्रं.१ असे उभे असलेल्या ठिकाणी आले. त्यानंतर डॉ.सैयद व माझेत माझे अॅम्ब्युलन्स वाहनांच्या बिलासंदर्भात चर्चा झाली. तेव्हा डॉ.सैयद यांनी तु जमा करुन ठेवले आहेत का? असे विचारले असता मी पैसे जमा आहेत

Dhiraj

माझेकडे असे सांगितले व तुमच्याकडे किती वाजता पैसे घेवुन येवु असे विचारले असता त्यांनी चार पाच वाजेला असे सांगितले.
तेव्हा मी त्यांना कुठे? असे विचारले असता डॉ.सैयद यांनी मी तुम्हाला फोन करतो, तिकडे येवुन जा,असे सांगितले. त्यानंतर मी व
पंच कं.१ असे सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर माझे व डॉ.सैयद यांचे सोबत झालेले संभाषण दोन्ही पंचानी व बच्छाव
साहेब यांनी ऐकले. तेव्हा बच्छाव साहेब व दोन्ही पंच यांची डॉ.सैयद यांनी माझेकडेस ६०,०००/—रु.लाच मागणी केल्याची खात्री
झाली.तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी मला ६०,०००/—रु.हजर करण्यास सांगितले. तेव्हा मी माझे जवळ उपलब्ध असलेले
१०,०००/—रु त्यात ५००/—रु.दराच्या २० नोटा बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केले व कळविले की, माझे जवळ फक्त १०,०००
/—रु.आहेत.तेव्हा पोनि.बच्छाव साहेब यांनी सापळा पथकातील सफौ.दिनेशसिंग पाटील यांना सापळा कार्यवाहीसाठी त्यांचेजवळ
उपलब्ध असलेल्या शासकिय २०००/—रु.दरांच्या नकली नोटांपैकी २५ नकली नोटा हजर करण्यास सांगितले. त्यानुसार त्यांनी
२०००/—रु.दराच्या २५ नकली नोटा एकुण ५०,०००/—रु.हजर केले. त्यानंतर माझेकडील ५००/—रु.दराच्या २० नोटा व
२०००/—रु.दराच्या २५ नकली नोटांना अ.पा.पावडर लावुन सदरच्या नोटांची घडी करुन माझे शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिश्यात
अलगद ठेवुन दिल्या होत्या.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच कं.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या.त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन नविन फाईल तयार केली.त्यानंतर लागलीच डॉ.सैयद यांचे मोबाईल फोनवरुन माझे मोबाईल फोनवर फोन आला. तेव्हा डॉ.सैयद यांनी मला काय रे, असे विचारले. तेव्हा मी त्यांना कुठे आहे? असे विचारले असता त्यांनी मी घरी आहे, दहा/पंधरा मिनीटात निघेल, मी फोन केला की, सिग्नल जवळ ये असे सांगुन फोन बंद केला. सदरचे संभाषण ध्वनीमुद्रीत झाले आहे.

त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन फाईल तयार करुन सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे शर्टच्या आत गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला, पंच कं.१ यांचेसह डॉ.सैयद यांची भेट घेण्यासाठी चाळीसगांव शहरातील मनमाड चौकातील सिग्नल जवळील प्रगती कॉर्नर जवळ माझे मोटार सायकलने पाठविले होते.

त्यानंतर मी व पंच कं.१ असे माझे मोटार सायकलने निघुन चाळीसगांव शहरातील मनमाड चौकातील सिग्नल जवळील प्रगती कॉर्नर जवळ गेलो. तेव्हा सदर ठिकाणी डॉ.सैयद हे दिसुन न आल्याने मी माझे मोबाईल फोनवरुन डॉ.सैयद यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा डॉ.सैयद यांनी मी दहा मिनीटात येतो असे सांगितले. परंतु काही वेळाने देखील डॉ.सैयद हे सदर ठिकाणी न आल्याने मी पुन्हा माझे मोबाईल फोनवरुन डॉ.सैयद यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा मी त्यांना मी प्रगती कॉर्नर जवळ आहे, पैसे घेवुन आलो आहे, तिकडे येवु का? असे विचारले असता त्यांनी मला हा येवुन जा ओपीडीकडे असे सांगितले. त्यानंतर मी व पंच कं.१ असे सदर ठिकाणाहुन निघुन चाळीसगांव शहरातील घाट रोडवरील डॉ.सैयद यांचे सैयद क्लिनिक येथे गेलो. तेव्हा मी माझी मोटार सायकल सदर क्लिनीकच्या बाहेर उभी केली. त्यानंतर सदर ठिकाणी उपस्थित एका इसमास सर आहेत का? असे विचारले तेव्हा त्यांनी सर आहेत असे सांगितले. त्यानंतर मी व पंच कं.१ असे डॉ.सैयद यांचे कॅबिनमध्ये गेलो. तेव्हा डॉ.सैयद यांनी मला उजव्या हाताच्या पहिल्या बोटाने व अंगठयाने इशारा करुन पैसे आणले आहेत का? असे विचारले असता मी त्यांना आणले आहेत असे सांगुन मी माझे शर्टचे वरील डाव्या बाजुच्या खिशात असलेले ६०,०००/—रुपये (त्यात २०००/—रु.दराच्या २५ नकली नोटा व ५००/— रुपये दराच्या २० चलनी नोटा) लाच रक्कम माझे उजव्या हाताने बाहेर काढुन सदरची रक्कम डॉ.सैयद यांचे समोर धरली असता डॉ.सैयद यांनी सदर लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजत असतांनाच मी लागलीच ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास इशारा केला. तेव्हा बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी डॉ.सैयद यांना नोटा मोजत असतांनाच रंगेहाथ पकडले.

त्यानंतर पोनि.बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा पोनि.बच्छाव साहेब यांनी डॉ.सैयद यांना पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील, त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डॉ.सैयद यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव डॉ.मुस्ताक मोतेबार सैयद, वय ३८, व्यवसाय डॉक्टर,रा.घाट रोड,चौधरी वाडा, चाळीसगांव (खाजगी व्यक्ती) असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात करण्यात आली. सदर कार्यालयातील एका रुममध्ये मुस्ताक मोतेबार सैयद, माझे व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतरची पुढील उर्वरीत सापळा कारवाई बच्छाव साहेब यांनी केली आहे. तसा सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी डॉ.मुस्ताक मोतेबार सैयद, वय ३८ व्यवसाय डॉक्टर,रा.घाट रोड,चौधरी वाडा, चाळीसगांव (खाजगी व्यक्ती) यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन तसेच आपल्या वैयक्तीक प्रभावाचा वापर करुन दि.२७.१२.२०२१ रोजी पंचासमक्ष माझे दोन्ही अॅम्ब्युलन्स वाहनांचे बिले मंजुरीसाठी लागणारे पत्र वैद्यकिय अधिक्षक,डॉ.मंदार करंबळकर यांचेकडुन तयार आणुन देण्याच्या मोबदल्यात माझेकडेस पंचासमक्ष ६०,०००/—रु.लाच मागणी केली. त्यानंतर सदर लाच रक्कम आरोपी याने दि.२७.१२.२०२१ रोजी १८.१९ वा. चाळीसगांव शहरातील घाट रोडवरील आरोपी यांचे सैयद क्लिनीक येथे स्वतः स्विकारली. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

फिर्यादीची सही